दिनांक ०४/०१/२०२४

## अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ०३/०३/२०२४ चे ००.०१ ते २४.०० वा.

दुखापत

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती अप क्र.१२१/२४ कलम ३२४,५०४, ५०६,३४,भादवी | लेविटेड नाईन फॅमीली रेस्टॉरेंट अँड बार ,बियानी चौक अमरावती | घ.ता.वेळ दि.०३ /०२/२०२४चे ०२.०० वा. माहीती दा.ता.वेळ दि.०३.०२. २०२४चे १६.४३ वा | अजय पुंडलीक लोवनकर वय २६ वर्ष व्यवसाय-वैद्यकीय अधिकारी रा.मरवाडी नायगाव ता.नायगाव जि. नांदेड ह.मु. पी.डी.एम.सी. हॉस्पीटल अमरावती | १) अंकुश तिवारी २)मंगेश तायडे ३) मनिष महाजनकर सर्व रा.अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व आरोपी यांचा नाचण्या वरुन वादविवीद झाल्याने यातील आरोपी क्र.१ यांने फि.च्या डाव्या गालावर स्टिलचे फायटर मारुन जख्मी केले तसेच आरोपी क्र.१.२.३ यांनी फि ला लाथाबुक्या मारुन शिविगाळ केली व आणखी मारण्याची धमकी दिली अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| 2 | पोस्टे वलगाव अप क्र. 37/2024 कलम 324,504, 506 भादवि. | ग्राम रामा शेत शिवारा | दि.03/02/ 2024 चे11/00 वा दाखल दि.03/02/ 2024 चे 22/53 वा. | अशोकराव गणपतराव सैरिस्ते रा. मु.पो. कामनापुरता. भातकुली जि. अमरावती | नंदु कैलास वासनिक रा कामनापुर ता.भातकुली जि.अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि,आज दि. 03/02/2024 रोजी सायंकाळी 04/00 वा दरम्यान गावातील गोठान जवळ नंदु वासनिक, अतुल गजभिये, विकी मेश्राम व मी असे आम्ही गप्पा करतअसताना नंदु वासनिक व माझ्या त बोलचाल झाली. वाद जास्त वाढु नये म्हमुण मी घरी निघुन गेलो. थोड्य वेळाने नंदु वासनिक माझ्या घरासमोर आलो व मला पुन्हा शिवीगाळ करु लागला. मी घरा बाहेर आलो, घरी एकटाच होतो व त्याला म्हटले कि मला “ तु मला शिवीगाळ का करत आहे.” तर तो मला म्हणाला कि, “ गावात मी च डॉन आहे. माझ्या पेक्षा मोठा कुणीच नाही.” असे म्हणुन माझ्या सोबत अरेरावी करु लागला. मी त्याला हटकल्या वर “ तु माझ काय करतो मी बघतो च तुला, अशी त्याने मला धमकी दिली ” व जवळचाच दगड उचलुन माझ्या डोक्यात मारला. त्या मुळे मला डोक्याच्या मागच्या बाजुला, माथ्यावर, डोळया जवळ व कानाला मार लागला. मी कल्ला केल्यावर तो पळुन गेला. त्याचे वर योग्य तीकार्य वाही व्हावी म्हणुन पोलीस स्टेशनला गोपाल महिंगे पुतण्या सोबत रिपोर्ट देण्या साठी आलो.अशा फिर्यादिच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

# जुलमाने घेने

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. कोतवाली ४४/२०२४ क लम ३८४,२९४, भादवि सहकलम ६५ ई IT अँक्ट | राहते घरी ,जुना कींटन मार्केट रोड गोपाल किराणा जवळ अमरावती | गुन्हा घडला ता.वेळ १५/१२/२०२३ चे संध्याकाळी ०९/०० वा ते १०/०० वाजता सुमारास गुन्हा दा. ता.वेळ ३/०३/२०२४ चे २०,०८ वाजता | सोनलकुमार सुरेशचंद्र गुप्ता रा ,जुना कींटन मार्केट रोड गोपाल किराणा जवळ अमरावती | अध्यान चव्हान रा.कानपुर उत्तर प्रदेश | हकिकत अश्या प्रकारे आहे की दि.१५/१२/२०२३ रोजी मि माझे मुली कडुन त्या मुलाचा फोन नंबर घेतला व त्या अध्यान चव्हान रा.कानपुर उत्तर प्रदेश संध्याकाळी ०९/०० वा ते १०/०० वा सुमारास फोन केला असता तो माझे सोबत उधतपणे बोलु लागला व मला धमकी दिली की तुमेच नातेवाईकाचे व माझे खाजगी फोटो आहे तुम्ही मला ५,००,०००/- रु १० दिवसा मध्ये द्या नाहीतर ते फोटो मि सोशल मिडीया वर वायरल करेल तसेच मि त्याला वारंवार समजावीन्याचा प्रयत्न केला असता त्याने मला माधरचोद ज्यादा माज मत जिताना बोला है उतना हि कर नही तो तेरी इज्जत उतार दुंगा असे म्हणुन मला शिविगाळ केली त्या मुळे मि माझे घऱचे घावरुन गेलो होतो त्यामुळे मि अध्यान चव्हान याला म्हटले की मला तुझ्या आई शि बोलायते आहे तर त्याने एका महिलेला त्याची आई म्हणुन फोन दिला मि तीला तिचे मुलास समजावीऩ्यास सांगीतले की अध्यायन चव्हाने जसे वागत आहे ते चुकीचे आहे पन त्याचे आईने सुध्दा उलट माझे सोबतच उध्दटपणे बोलत मला धमकी दिली मेरा बेटा जैसै बोल रहा है उतने पैसै लाकर दे दो फिर मै उसको बोलती नहाी तो वह फोटो व्हायरल कर देगा व त्या नंतर अद्यायन चव्हान याने मी त्याचेशी बोलत असतांना माझे पुतन्या श्लोक गुप्ता रा.अमरावती याचे इन्ट्राग्राम आय.डि वर माझे नातेवाईकाचे अद्यायन चव्हान याचे सोबत एकत्र असलेले अस्लील फोटोग्राफ पाठवीले व मला उद्देशुन म्हटले की अभी तो रिश्तेदार के हि ईन्स्टेग्रामपर भेजा हुआ है.अगर पैशै नही दिये तो सोशल मिडिया पर व्हायरल कर दुंगा.त्या नंतर सुध्दा अध्यान चंव्हान याने मला व माझे मुलीला बरेच वेळा फोन करुन धमकी दिल्या आहे. त्यामुळे आम्ही घाबरुन गेलो होतो.त्यामुळे पोलीस स्टेशन ला येवुन रिपोर्ट दिला नाही तरी ही अद्यायन चव्हान रा,कामपुर उत्तर प्रदेश याचा त्रास दिवसेन दिवस वाठत अस्लायने त्याचे या वागणुकी मुळे माझे मुलीचे आयुक्श बरबाद होण्याचे शक्याता आहे करीता आज रोजी दि.०३/०२/२०२४ रोजी मि पोलीस स्टेशन ला प्रत्यक्ष येवुन कायदेशीर कार्यवाही व्हावी करीता जबनी रिपोर्ट देत आहे |

## चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अप. न. ९८/२०२४ क. ३७९ भादवि. | राजुरा नाका, खंडेलवाल पेट्रोलपंप जवळ, मार्डी रोड अमरावती | घटना ता वेळ - दि. ०३/०२/२०२४ चे सकाळी ०३/०० वा. ते ०४/३० वा. दरम्याण दाखल ता वेळ - दि. ०३/०२/२०२४ चे २०/१८ वा. | श्री सुनील वामनराव डहाणे वय ५४ वर्ष रा. पिंपळखुटा ता. जि. अमरावती | तीन अज्ञात इसम | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे यांनी राजुरा नाका, खंडेलवाल पेट्रोलपंप जवळ, मार्डी रोड अमरावती येथे त्यांच्या खुल्या प्लॉट वर हार्डवेअर चे दुकाण टाकायचे असल्याने बांधकाम सुरु केले होते. त्यासाठी लागणारे लोखंड बांधाकामाचे ठिकाणी ठेवलेले होते. त्या ठिकाणी राहणारा मजदुर नामे पाटनकर हा तेथे झोपडी मध्ये राहत आहे. त्याने मला सकाळी ०७/३० वा. बांधकामाच्या ठिकाणी चोरी झाल्याचे सांगीतले. म्हणुन मी बांधकामाचे ठिकाणी आलो असता बांधकामावर लावलेले सीसीटीव्ही तपासले तसेच बांधकामाच ठिकाणी ठेवलेले साहीत्य सुद्धा पाहीले. सीसीटीव्ही मध्ये चेक केले असता तिन अनोळखी व्यक्ती साधारनता २५ ते ३५ वयोगटातील एक इसम बांधकामावरील तिन कॅमेरापैकी दोन कॅमेरा वाकवितांना दिसत आहे. तसेच अनोळखी तिन व्यक्तीनी बांधकामावरील १६ एमएम च्या लोखंडी सलाखा कापुन ठेवलेल्या कि.अ.१००००/- रुपये चा माल चोरुन नेल्या आहेत. अश्या फिच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती अप क्र. १२३/२४ कलम ३७९, भादवी | सह्याद्री हाइट साईड तपोवन गेट ला लागुन अमरावती | घ.ता.वेळ दि.०३ /०२/२०२४चे १९.३० वा. माहीती दा.ता.वेळ दि.०३.०२.२०२४चे २१.५६ वा | शुभम राजेन्द्र खंडारे वय ३० वर्ष,रा. कु-हा ता.तिवसा जि.अमरावती | १ )रुषिकेश संजय सोनवने वय १७ वर्ष,रा.मालविये अपार्टन्ट रेसिडेन्सी तपोवन पंचशील चौक ,२) रोहीत स्वर्ग ,३)रौनक चराटे वय १६वर्ष,रा.अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे सह्याद्री हाईट बाधकाम चालु असलेली बिल्डींग येथे सुपरवायजर म्हणुन काम करतात त्यांचे बांधकामावर मागील एक महीन्या पासुन लोखंडी बार३२ चे १२ दोन नग की.अं.१५००/-रु. व २५चे दोन बार नग लोखंडी कि. अं.७००/--रु.व २० चे ३ नग लोखंडी कि.अं.५००/-रु.असा एकुन २७००/-रु.चा माल चोरी गेला दि.०३.०२.२०२४ रोजी १९.३० वा दरम्याण फि.ला सदर ठिकाणी ३ मुले लोखंड बार उचलतांना व चोरी करतांना दिसले त्यातील फी नी एका जनाला पकडले व दोन जन पडुन गेले अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | पो.स्टे नागपुरीगेटअप क् ३७/२४ कलम ३७९ भादवी | चारा बाजार समोर भातकुली रोड अमरावती | दि. ०३/०२/२४ चे ०४/००वा पुर्वी दाखल दि. ०३/०२/२४ चे २२/०७ वा | आसिफ खान नसीर खान वय ४४ वर्ष रा. धरमझेंडी चारा बाजार अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी त्याच्या मालकीचे अँटो मधुन कु णीतरी अज्ञात चोराने १)बॅटरी १२ मेट्रो एन४५ए.एच.एस.आर.क्र २२आय.१२८० कि. १२००२)अँटो ची स्टेपनी कि. १००० रु अशा एकुण २२००रु चा सामान चोरी करुन नेले अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## मंदिर चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पो स्टे फ्रेजरपुरा अप. न. ९६/२०२४ क. ३७९ भादवी | फ्रेजरपुरा गल्ली न. ५,भगतसिंग चौक, अमरावती | घटना ता वेळ - दि. ०३/२/२०२४ चे ०८/०० वा. दाखल ता वेळ - दि. ०३/०२/२०२४ चे १६/०४ वा. | महेन्द्र रामभाउ बंडे वय ५८ वर्ष रा. फ्रेजरपुरा गल्ली न. ५,भगतसिंग चौक, अमरावती | अज्ञात | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे विठ्ठल रुख्माई मंदीर फ्रेजरपुरा गल्ली न. ५,भगतसिंग चौक, अमरावती च्या कमेटी मध्ये सचिव म्हणुन काम पाहतो. नमुद घटना ता वेळी व ठिकाणी एक महीला हे पुजा करण्याकरीता हे विठ्ठल रुख्माई मंदीरात गेली असता मंदीरात श्री कृष्ण भगवान यांची मुर्ती त्यांना दिसुन आली नाही. तशी माहीती त्यांनी त्यांच्या मुलाद्वारे कमेटी यांना देवुन बोलावुन घेतले. व त्यांना सांगीतले. तरी आम्ही मंदीर कमेटी यांनी चर्चा करुन` विठ्ठल रुख्माई मंदीर फ्रेजरपुरा गल्ली न. ५,भगतसिंग चौक, अमरावती येथील मंदीरात ठेवलेली श्री कृष्ण भगवान यांची पितळाची वजन अंदाजे ८०० ग्राम जुनी वापरती जीची अंदाजे किंमत ५००/- रुपये असुन कोणीतारी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली करीता फिहे पो स्टे ला रिपोर्ट देत आहे. अश्या फिच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## अपघात

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती अप क्र.१२२/२४ कलम २७९, ३३७,३३८,भादवी | बनकर हाँस्पीटल च्या थोड्या अंतरावर शेगाव नाका अमरावती | घ.ता.वेळ दि.३१/०१/२०२४चे १९.३० वा. माहीती दा.ता.वेळ दि.०३.०२.२०२४चे २०.०६ वा. | मनोज भिमराव वानखडे रा. सोनल काँलनी संगीता नगर शेगाव रोड अमरावती | एम एच २७ सी. एल ८९१२ चा चालक | हकिकत अशा प्रकारे आहे की,यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची मावस बहीन व मावस बहीनीची मुलगी या रस्त्याने पाई जात असत्यांना आरोपीने तिच्या ताब्यातील वाहण बेजबाबदार पणे व निष्काळजी पणे चालवुन धडक दिली त्यामुळे फिची मावस बहीन व मावस बहीणीची मुलगी या गंभीर जख्मी झाल्या अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ईतर

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा पोस्टे फ्रेजरपुरा अप क्र ९७/२४ कलम २८५ भादवि. | यशोदा नगर ते मोती नगर कडे जाणा-या रोडवर अमरावती | घटना ता वेळ - दि. ०३/०२/२०२४ चे १७/४५ वा. दाखल ता वेळ - दि. ०३/०२/२०२४ चे १८/५६ वा. | सरतर्फे नापोकाँ. हरीष बुंदेले ब. न. ९२४ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती | योगेश कृष्णराव बनसोड वय ४० वर्ष रा. यशोदा नगर न. ०५, अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आहे की य़ातील फिर्यादी हे पो स्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना नमुद घटना ता वेळी यातील आरोपी हा त्याचे ताब्यातील अंडा ऑम्लेट विक्रीची हातगाडी सार्वजनिक ठिकाणी धोकादायक स्थीतीत ज्वालाग्राही पदार्थाचा हयगयीने व मानवी जिवणास धोका निर्माण होइल अश्या हयगयीने हाताळतांना आढळुन आला. करीता त्याचे वर कलम २८५ भादवि. प्रमाणे गुन्हा दाखल |
| 2 | पोस्टे वलगाव अप.क्र. 36/24 कलम 435 भादविप्रमाणेदाखल. | ग्राम रामा शेत शीवार | दि.03/02/2024 चे11/00 वा. दाखल दि.03/02/2024 चे 22/26 वा. | रामदास भयूजी मंगळे वय 81 वर्ष व्यवसाय. शेती रा.रामा ता.भातकूली जि.अमरावती. | अज्ञात. | दि.03/02/2024 रोजीसकाळी 11.00 वा मी माझा पूतण्या जितेन्द्रबाबूराव मंगळे याने फोन केलाव म्हटले की सोकारी राजकूमार वटेल हा गवत घेवून आला नाही त्यामूळे मला मी त्याची वाट पाहत आहे ते आले नंतर मी त्याचे सोबत येणार होता तो न आल्याने मी घरीच त्याची वाट पाहत आहे तेव्हा मला मझा पुतण्या जितेन्द्र बाबूराव मंगळे यांची नातेवाईक ही चा मला फोन आला तेव्हा मी फोन वर म्हटले की जितू कोठे गेला तेव्हा मला सांगीतले की शेतातील असलेल्या घरा मध्ये आग लागलेली आहे त्या नंतर मी व माझा मूलगा विवेक असे शेतात गेलो असता मला शेतातील खोलीत असलेला 10 क्विंटल कापूस जलाले ला दीसला तेथे जितू मंगळे रवि अंबादास मंगळे गजानन बोचे व गावातील इतर लोक खोली तील आग विझावत होते पण कापूस पेटत होता अंदाजे 10 क्विंटल कापूस कि. अंदाजे 60000 जलालेला होता तो काणी जाळला या बाबत माझा कोणावरही शंक्षय नाही व मला माहीत नाही आग लागल्या बाबत मला तेथे हजर असलेल्या पैकी कोणही काही सांगीतले नाही तरी आगलावलेल्या अज्ञात इसमावर योग्य ती कार्यावाही व्हावी करीता रिपोर्ट देते आहे अशा फिर्यादी चे जबानी रिपोर्ट वरून सदर चा गुन्हा दाखल |